महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०९/ ४१६१५
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
**दिनांक: २२.१२.२०२५**

# परिपत्रक

विषय :- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांकरीता सन-२०२६ या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया जाहीर करणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्र.१८४ दि.०८.१२.२०२५.

*****

महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०८.१२.२०२५ च्या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.०१ दि.२९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, सक्षम अधिकारी यांनी सन-२०२६ या कॅलेंडर वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या १९ (एकोणीस) सार्वजनिक सुट्टया महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता जाहीर करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. तथापि, म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच सामान्य आदेश क्र.१२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (Annexure-'A') आणि त्यानंतरच्या दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.१९९० च्या पूरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी यांना सदरच्या सुट्टया लागू राहणार नाहीत.

२. म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मधील पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता त्या कर्मचाऱ्यांना तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/आस्थापना) या ठिकाणी काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र.१२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (Annexure-'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.१९९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर कार्यरत कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन किंवा त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त ६ (सहा) भरपगारी सुट्टया जाहीर करण्यास सक्षम अधिकारी यांनी मंजूरी प्रदान केलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया नियंत्रण अधिकाऱ्यांची पूर्व मंजुरी घेऊन उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन-२०२६ या वर्षी प्रजासत्ताक दिन (दि.२६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि.१५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि.०१ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली किंवा पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत**:- सन-२०२६ सार्वजनिक सुट्टयांची सूची (परिशिष्ट - 'अ')

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं/ वित्त व लेखा)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/ क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)/(नियोजन)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

परिशिष्ट 'अ'

**महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्र.१८४ दि.०८.१२.२०२५ अन्वये**

## सार्वजनिक सुट्टया -२०२६

**(अ) सार्वजनिक सुट्टया**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२६ | सोमवार |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२६ | गुरुवार |
| ३ | होळी (दुसरा दिवस) | ०३ मार्च, २०२६ | मंगळवार |
| ४ | गुढीपाडवा | १९ मार्च, २०२६ | गुरुवार |
| ५ | रामनवमी | २६ मार्च, २०२६ | गुरुवार |
| ६ | महावीर जन्म कल्याणक | ३१ मार्च, २०२६ | मंगळवार |
| ७ | गुड फ्रायडे | ०३ एप्रिल, २०२६ | शुक्रवार |
| ८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२६ | मंगळवार |
| ९ | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०२६ | शुक्रवार |
| १० | बुध्द पौर्णिमा | | |
| ११ | बकरी ईद (ईद-उल झुआ) | २८ मे, २०२६ | गुरुवार |
| १२ | मोहरम | २६ जुन, २०२६ | शुक्रवार |
| १३ | ईद-ए-मिलाद | २६ ऑगस्ट, २०२६ | बुधवार |
| १४ | गणेश चतुर्थी | १४ सप्टेंबर, २०२६ | सोमवार |
| १५ | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०२६ | शुक्रवार |
| १६ | दसरा | २० ऑक्टोबर, २०२६ | मंगळवार |
| १७ | दिवाळी (बलिप्रतिपदा) | १० नोव्हेंबर, २०२६ | मंगळवार |
| १६ | भाऊबीज | ११ नोव्हेंबर, २०२६ | बुधवार |
| १८ | गुरुनानक जयंती | २४ नोव्हेंबर, २०२६ | मंगळवार |
| १९ | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२६ | शुक्रवार |

**(ब) खालील सुट्टया या महिन्याच्या शनिवार व रविवारी येत असल्यामुळे त्या दिवशी प्रशासकीय कार्यालयांना सार्वजनिक सुट्टी नसेल.**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | महाशिवरात्री | १५ फेब्रुवारी, २०२६ | रविवार |
| २ | रमझान ईद (ईद उल-फितर) (शव्वल -१) | २१ मार्च,२०२६ | शनिवार |
| ३ | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२६ | शनिवार |
| ४ | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | | |
| ५ | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | ०८ नोव्हेंबर, २०२६ | रविवार |